**जिल्हा परिषद, गडचिरोली**

**सामान्य प्रशासन विभाग**

**दुरध्वनी क्रमांक (०७१३२) २९७४६३** Email:- zpgadmail@gmail.com


क्रमांक/जिपग/साप्रवि/आस्था-१(ब)/ 1103 /२०२४ दिनांक:- 24 / 05 / २०२४

संदर्भ :- कार्यालयीन परिपत्रक क्रमांक/जिपग/साप्रवि/आस्था-१(ब)/१२६/२०२४ दिनांक १५.०१.२०२४

---

## प रि प त्र क :-

जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासंबंधाने माहे ११ डिसेंबर, २०२३ अखेरपर्यंत प्राप्त अनुकंपाधारकांची एकूण ४६४ प्रकरणांची तात्पुरती प्रतिक्षाधिन सूची व संभाव्य नियुक्ती संबंधाने माहिती पुर्ण असलेले वर्ग-३ व वर्ग-४ चे १९८ प्रकरणे असे दोन स्वतंत्र सूची उपरोक्त संदर्भिय परिपत्रकानुसार **सुचना फलक / जिल्हा परिषद चे संकेतस्थळावर (www.zpgadchiroli.in) वर** प्रकाशित करण्यात आली होती.

सबब तात्पुरती प्रकाशित सुचीवर माहिती पुर्ण / माहिती अपुर्ण प्रकरण असलेल्या २० अनुकंपाधारक उमेदवारांनी आक्षेप नोंदविलेले असून सदर आक्षेपांचे अनुपालन सादर करून **माहे मार्च-२०२४ अखेरपर्यंत प्राप्त माहिती पुर्ण २५१ व माहिती अपुर्ण २५७ अशी एकूण ५०८ प्रकरणांची प्रतिक्षाधिन सूची** जिल्हा परिषद, गडचिरोलीचे सुचना फलक / जिल्हा परिषदचे संकेतस्थळावर (www.zpgadchiroli.in) अंतिम सुची याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

**(आयुषी सिंह,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

**प्रतिलिपी :-**

१) खाते प्रमुख, जिल्हा परिषद, गडचिरोली(सर्व)------------------------------------------

२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती(सर्व)------------------------------------------

यांना माहिती तथा पुढील आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. सदरहु पुर्ण/अपुर्ण असलेल्या प्रकरणांची अंतिम प्रतिक्षाधिन सूची जिल्हा परिषद संकेतस्थळावर (www.zpgadchiroli.in) प्रसिध्द करण्यात आलेली असुन सदर सुची आपले सुचना फलकावर प्रसिध्द करावी.

# विवरणपत्र-अ

**या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक/जिपग/साप्रवि/स्था-1(ब)/अनुकंपा/126/ दिनांक 15-01-2024 अन्वये प्रकाशित करण्यात आलेल्या अनुकंपा तात्पुरती सूची सन 2023 वर प्राप्त आक्षेपाबाबत माहिती.**

| अ.क्र. | अपुर्ण/पुर्ण यादीतील अ.क्र. | सुधारीत यादीतील अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | आक्षेप | तात्पुरत्या प्रकाशित अनुकंपा जेष्ठता सूचीवर प्राप्त झालेल्या आक्षेपानुसार दुरूस्ती | आक्षेपावरील निराकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ७० अपुर्ण | ६० | श्री दिग्वीजय दिलीप कस्तुरे मु.इंदिरा नगर बर्डी वार्ड क्र.८ आरमोरी जि.गडचिरोली | कार्यालयीन पत्र क्र.१८१/२०२१ दि. २०.०१.२०२१ नुसार माझ्या सोबत पत्र व्यवहार करण्यात आला आणि मी स्वत: संपुर्ण दस्तऐवज आपल्या कार्यालयात दि. ९.२.२०२१ ला सादर करण्यात आले. परंतू आज दि. १६.०१.२०२४ ला पुनच्या माझ्या नावाचा संबंध नसून माझी आई श्रीमती मिना दिलीप कस्तुरे व दिग्वीजय दिलीप कस्तुरे यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. | आक्षेपाच्या अनुषंगाने मागील अनुकंपा तत्वावरील नेमणूकीकरीता प्रतिक्षा यादींची पडताळणी करण्यात आली असून त्यानुसार श्रीमती मिना दिलीप कस्तुरे(आई) यांचे नावाऐवजी श्री दिग्वीजय दिलीप कस्तुरे(मुलगा) यांचे नावाची नोंद पुर्वीप्रमाणे घेण्यात आलेली आहे. | आक्षेप मान्य |
| २ | ८७ पुर्ण | ८७ | श्रीमती मृणालताई मनोहर सहारे मु.पो.येरकड ता.धानोरा जि.गडचिरोली | माझे नांव प्रकरण क्रमांक अनुकंपा २०१७/४४७ अनुक्रमांक ८७ वर आलेले आहे. सर्व कागदपत्रे दिनांक ११.०२.२०२१ ला सादर केलेले असुन सुध्दा माझे नांव इतर वारसानच्या मागे आलेले आहेत. | आपण सर्व कागदपत्रे दिनांक ११.२.२०२१ ला सादर केलेले असून सुध्दा माझे नांव इतर वारसानच्या मागे आलेले आहेत असा आक्षेप नोंदविलेला आहे. त्यानुसार आपल्या प्रकरणाची तपासणी केली असता असे दिसून येते की, आपण दिनांक ११.२.२०२१ ला सादर केलेल्या अर्जासोबत इतर सर्व दस्ताऐवज सलग्न केलेले होते. परंतु त्यामध्ये महत्वाचे दस्ताऐवज परिशिष्ट ब जोडलेले नव्हते. ते आपण दिनांक १४.०७.२०२१ रोजीचे अर्जानुसार (परिशिष्ट ब) सादर केलेले आहे. त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २१.०९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार दिनांक १४.०७.२०२१ रोजी प्रकरण पुर्ण झाल्याने आपली दिनांक १४.७.२०२१ पासून जेष्ठता लावण्यात आलेली आहे. | आक्षेप अमान्य |
| ३ | ९ अपुर्ण | १०५ | कु. प्राचिता गणेश साखरे मु.गौतम नगर वार्ड पवनी ता.पवनी जि.भंडारा मो.नं.८८३०८५७१०६ | मी दि.१२.७.२०१८ ला संबंधीत विभागामध्ये प्रकरण सादर केले. तसेच सन २०२१ मध्ये मी तिनदा असे दि.२७.८.२०२१, दि.३.९.२०२१ व दि.१८.११.२०२१ ला अर्ज सादर केला. त्यामध्ये दस्ताची कमतरता संबंधी संपुर्ण दस्त सादर केलेले होते. मी सादर केलेल्या दस्तामध्ये वारसान प्रमाणपत्र मा. तहसिलदार, पवनी यांचेकडून प्राप्त झालेले ते जोडले होते. तरी देखील माझे नांव अनुकंपा यादीमध्ये समाविष्ट झालेले नाही. मी सन २०२१ मध्ये संपूर्ण दस्ताची पुर्तता केल्यानंतर संबंधित कार्यालयात चौकशी करता गेली चौकशी अंती माझे नांव अनुकंपा यादीत नावच नाही. अनुकंपा यादीत माझे नांव ८७ वर नोंद क्रेली हि नोंद सन २७.१२.२०२२ ची अंतिम यादीमध्ये नांव समाविष्ट होते. दि. १६.१.२०२३ च्या अंतिम यादीत माझे नाव अनुक्रमांक १५७ वर नोंद होते. वारसान प्रमाणपत्र तहसिलदार यांचे कडून प्राप्त झालेले जोडली. न्यायालयातुन मिळाला पाहीजे होते, असे बोलले. जर याची माहिती मला दिली असती तर मी वेळेमध्येच दस्ताची पुर्तता केली असती. मी न्यायालयामध्येही वारसान प्रमाणपत्र मिळण्याबाबत प्रकरण सादर केलेले आहे ते प्राप्त होईल. मला शासनात सेवेत सामावून घेण्याकरीता माझ्या नावाची नोंद प्रथम यादीनुसारचे निर्धारीत करण्यात यावी. | आपण सन २०२१ मध्ये मी तिनदा असे दि.२७.८.२०२१, दि.३.९.२०२१ व दि.१८.११.२०२१ ला अर्ज सादर केला. परंतु त्या विनंती अर्जापैकी आपण **दि.०३.०९.२०२१** रोजी चे अर्जानुसार अनुकंपा तत्वावर नेमणूकीकरीता उर्वरीत दस्ताऐवज जसे- परिशिष्ट ब, न्यायालयीन वारसान प्रमाणपत्र सादर केलेले असून त्यादिनांकाला प्रकरण पुर्ण झालेले असल्यामुळै सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २१.०९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार दिनांक ०३.०९.२०२१ पासून जेष्ठता लावण्यात आलेली आहे. आपले आक्षेप मान्य केलेले आहे. | आक्षेप मान्य |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ३९ अपुर्ण | १०९ | कु. अंकिता आनंदराव दोनाडकर मु.वघाळा बर्डी ता.आरमोरी जि.गडचिरोली | दिनांक १५.०९.२०२१ ला संपुर्ण दस्ताऐवज सादर केले आहे. तरी सदर दिनांकापासून माझे जेष्ठता क्रम लावून प्रकरण पुर्ण यादीमध्ये समाविष्ठ करण्यात यावे. | दिनांक १५.०९.२०२१ रोजीचे अर्जानुसार अनुकंपा तत्वावर नेमणूकीकरीता संपुर्ण दस्ताऐवज सादर केलेले आहे अशा आपल्या आक्षेपानुसार प्रकरणाची खात्री करण्यात आली असून सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार दि.१५.९.२०२१ रोजी प्रकरण पुर्ण झाल्याने त्यादिनांकानुसार जेष्ठता लावण्यात आलेली आहे. आक्षेप मान्य करण्यात आलेले आहे. | आक्षेप मान्य |
| ५ | ११४ पुर्ण | ११० | श्री सारंग गेमदास दुधबावरे मु.अयोध्या नगर गडचिरोली | माझे अनुकंपा यादीतील पूर्ण दस्ताऐवज सादर केल्याचा दि. ९.१०.२०२१ हा टाकण्यात आला आहे. हे दस्ताऐवज मी १६.०९.२०२१ ला पंचायत समिती कोरची येथे सादर केले होते. आणि दि. २०.९.२०२१ ला दुसरी प्रत जिल्हा परिषद गडचिरोली ला दिले आहे. | आपण जिल्हा परिषद गडचिरोली येथे दि. २०.९.२०२१ रोजीचे अर्जानुसार अनुकंपा तत्वावर नेमणूकीकरीता प्रस्ताव परिपुर्ण दस्ताऐवजासह सादर केलेला आहे. **त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार** दि. २०.९.२०२१ पासून आपली जेष्ठता लावण्यात आलेली आहे. आक्षेप मान्य करण्यात आलेले आहे. | आक्षेप मान्य |
| ६ | १६४ अपुर्ण | ११४ | श्रीमती मनाई विजय मडावी मु.पो.कोलारा(तुकूम) ता.चिमुर जि.चंद्रपुर | मी दि.२६.०३.२०२१ ला परिपुर्ण दस्ताऐवज/कागदपत्र आपल्या कार्यालयास सादर केलेली आहे. परंतू सन २०२३ च्या दि. १५.०१.२०२४ प्रकाशित केलेल्या यादीमध्ये दि. ६.५.२०२२ ला परिपुर्ण दाखविण्यात आलेली आहे. व अ.क्र.१६४ वर माझे नांव घेण्यात आलेले आहे. तरी माझे अनुकंपा प्रकरण दिनांक २६.३.२०२१ असे दर्शविण्यात यावे करिता आक्षेप नोंदविण्यात येत आहे. | आपण दिनांक २६.०३.२०२१ रोजी चे अर्जासोबत परिशिष्ट ब, अपत्याचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र व इतर शैक्षणिक दस्ताऐवज सादर केलेले आहेत. परंतु त्यासोबत आवश्यक दस्ताऐवज सादर केलेले नव्हते. ते आपण दि.०४.१०.२०२१ रोजीचे अर्जानुसार (न्यायालयीन वारसान प्रमाणपत्र व इतर दस्ताऐवज) सादर केलेले असल्याने सदर दिनांकाला प्रकरण पुर्ण झाले आहे. **त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. २१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार** दि.६.५.२०२२ चे ऐवजी दि.४.१०.२०२१ पासून आपली जेष्ठता लावण्यात आलेली आहे. आक्षेप अंशत: मान्य करण्यात आलेले आहे. | आक्षेप अंशत: मान्य |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | १२९ पुर्ण | १५५ | श्री निर्णय ओमप्रकाश दुधे<br>मु.पो.त.ब्रम्हपुरी जि.चंद्रपुर | जेव्हा अनुकंपाकरीता प्रस्ताव सादर केला. तेव्हा न्यायालयाचे कुटूंबाचे वारसान प्रमाणपत्र मागितले नव्हते. व आमची पेंशन केस ही दि. १७.७.२०१७ ला मंजुर करण्यात आली होती. व त्यानंतर आम्हाला शासकीय लाभ सुध्दा देण्यात आला होता. परंतु सदर शासकीय लाभ देतांना किंवा पेंशन केस मंजुर करते वेळेस सक्षम न्यायालयाचे उत्तराधिकार प्रमाणपत्राची मागणी केली नव्हती, परंतू त्यानंतर आपले कार्यालयामार्फत माझे अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावून घेण्याकरीता दाखल केलेल्या अर्जासोबत समक्ष न्यायालयाचे उत्तराधिकार प्रमाणपत्र सादर करण्यास दि.२०.१.२०२१ चे पत्रान्वये कळविले. व त्यानुसार मी सक्षम न्यायालयात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज सादर केला होता. परंतू तेव्हा कोव्हीड-१९ या आजाराचा प्रार्दुभाव असल्यामुळे न्यायालयामधील कामकाज बंद असल्यामुळे माझे न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र मिळू शकले नाही. व त्यानंतर न्यायालयाचे उत्तराधिकार प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर न्यायालयाचे उत्तराधिकार प्रमाणपत्र दि.२८-०२-२०२२ रोजी सादर केले आहे. असे असतांना देखील आपले कार्यालयामार्फत प्रकाशित करण्यात आलेल्या अनुकंपा परिपुर्ण यादीमध्ये माझे नंतर अर्ज सादर केलेल्या लाभार्थ्यांना माझे नावाचे पुढे त्यांचे नाव प्रकाशित करुन माझेवर अन्याय झालेला आहे. त्यामुळे सदर यादीत दुरुस्ती करुन जेष्ठतेनुसार माझे नाव अनुकंपा परिपुर्ण यादीत समाविष्ठ करुन नविन यादी प्रकाशित करण्यात यावी. | आपण घेतलेल्या आक्षेपानुसार प्रकरणाची तपासणी केली असता दि. १४.१२.२०१५ ला अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याकरीता प्रथम विनंती अर्ज सादर केले असून त्यासोबत मृत्यु प्रमाणपत्र जोडलेले आहे. त्यानंतर दि. २.११.२०२१ चे विनंती अर्जान्वये जी कागदपत्र दिली त्यासोबत वारसान प्रमाणपत्र व विवाहीत/ अविवाहीत/ लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र जोडण्यात आलेले नव्हते. ते आपण दिनांक २८.०२.२०२२ चे अर्जान्वये न्यायालयीन वारसान प्रमाणपत्र व अविवाहीत असल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्यामुळे आपले प्रस्ताव दिनांक २८ ०२ .२०२२ रोजी प्रकरण पुर्ण झालेले आहे. त्यामुळे **सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार** आपली दि. २८.०२.२०२२ (प्रकरण पुर्ण) पासून जेष्ठता लावण्यात आलेली आहे. | आक्षेप अमान्य |
| ८ | | १३७ | श्री अभय गोपाल मडावी<br>मु.पटेल मोहल्ला अहेरी वार्ड क्र.१३ अहेरी जि.गडचिरोली | मी अनुकंपा नियुक्ती तत्वावर नोकरी मिळण्याकरीता रितसर गट विकास अधिकारी, पं.स.अहेरी यांचे मार्फत दिनांक २२.१२.२०१० रोजी विहीत कालावधीत अर्ज सादर केला. परंतू जि.प. प्रशासनाने माझा अर्ज विहीत कालावधीत सादर केला नसल्याची कारण सांगून फेटाळून लावला व माझे नाव अनुकंपा यादीमध्ये समाविष्ठ न करता त्या वेळेस अनुकंपा प्रतिक्षा यादर प्रकाशित करून मला सन २०११ पासून जिल्हा परिषद प्रशासनाच्या चुकीमुळे अनुकंपा नियुक्ती पासून वंचीत ठेवण्यात आले.दिनांक १५.०१.२०२४ ला प्रसिध्द करण्यात आलेल्या सन २०२३ च्या अनुकंपा यादीमध्ये माझे नांव समाविष्ठ करण्यात आलेले नसल्यामुळे माझे नांव सन २०२३ च्या अनुकंपा यादीमध्ये समाविष्ठ करण्याबाबत. मी माझे नांव अनुकंपा यादीमध्ये का समाविष्ठ करण्यात आले नाही? याबाबत चौकशी करून जन माहिती अधिकारी तथा सहा.प्रशासन अधिकारी (सा.) यांचेकडे माहितीचे अधिकारामध्ये माहिती मागविली असता संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये मला जन माहिती अधिकारी यांनी माझा अर्ज विहीत कालावधीमध्येच प्राप्त झालेला असल्याचे कळवून आपले नांव सन २०२१-२०२२ च्या अनुकंपा यादीमध्ये पुनच्छ समाविष्ठ करण्यात येईल असे कळविले आहे. महोदय माझी आपणास विनंती आहे की, दिनांक १५.०१.२०२४ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या सन २०२३ च्या अनुकंपा यादीमध्ये माझे नाव समाविष्ठ करण्यात आलेले नसल्यामुळे माझे नाव सन २०२३ च्या अनुकंपा यादीमध्ये समाविष्ठ करून मला जिल्हा परिषद सेवेत अनुकंपा तत्वावर लवकरात लवकर सामावून घेण्यात यावे. | आपले आक्षेपानुसार प्रकरणाची पडताळणी केली असता गट विकास अधिकारी, पं.स.अहेरी येथे विहीत मुदतीत दि. २२.१२.२०१० रोजी आपण अर्ज सादर केलेला असल्याचे छायांकीत प्रतीवरून दिसुन आले. परंतू अनुकंपा नियुक्ती करीता आवश्यक असलेले संमतीपत्र व कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र आपण दि. १३.१२.२०२१ च्या अर्जान्वये सादर केल्याने त्या दिनांकाला प्रकरण पुर्ण झालेले आहे. त्यामुळे **सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.२१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार** दि. १३.१२.२०२१ पासून जेष्ठता लावण्यात आलेली आहे. व आपले आक्षेप मान्य करण्यात आले आहे. | आक्षेप मान्य |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ८५ अपुर्ण | १७८ | श्री अंशुल रमेश घोडमारे संस्कृती लॉन च्या समोर, ता.जि.गडचिरोली | मी माझे कागदपत्र दि. २६.६.२०२०, दि. ०६.१०.२०२१ तसेच दि २३.८.२०२२ या तारखेला पुर्ण केले असुन सुध्दा माझे नांव अपुर्ण कागदपत्र या यादीत टाकण्यात आले. याबाबत चौकशी करून माझे नांव पुर्ण कागदपत्र या यादीत टाकण्याबाबत. | आपण आपले कागदपत्र दि. २६.६.२०२०, दि. ०६.१०.२०२१ तसेच दि २३.८.२०२२ या तारखेला पुर्ण केले असुन सुध्दा माझे नांव अपुर्ण कागदपत्र या यादीत टाकण्यात आले याबाबतचे आक्षेप नोंदविलेले असून प्रकरणाची पडताळणी केली असता दि. २६.६.२०२०, व दि. ०६.१०.२०२१ रोजीचे अर्जासोबत आवश्यक असलेले दस्ताऐवज परिशिष्ट ब हे सादर केलेले नव्हते. ते आपण दिनांक २३.८.२०२२ ला सादर केल्याने त्या दिनांकाला प्रकरण पुर्ण झाले असल्याने सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.२१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार दि.२३.८.२०२२ पासून जेष्ठता लावण्यात आलेली आहे. आपले आक्षेप मान्य करण्यात आले आहे. | आक्षेप मान्य |
| १० | २०७ अपुर्ण | १७९ | श्री खेमचंद घनश्याम उंदिरवाडे, मु.पो. येरकड मो.नं. ९८२२६९००१८ | मी अनुकंपा तत्वावर नेमणुकीकरीता प्रस्ताव सादर करणेसाठी आपल्या कार्यालयास माहे जाने. २०२१ मध्ये आलो असता कोर्टाचे वारसान व ईतर सर्व दस्तऐवज जोडले शिवाय प्रकरण सादर करता येणार नाही असे कारण दाखवून माझे प्रकरण स्विकारण्यात आले नाही. त्यामुळे मी कोर्टाचे वारसान व इतर संपुर्ण दस्तऐवज घेवून दिनांक २४.०८.२०२१ रोजी प्रकरण सादर केलेले असून प्रसिध्द केलेल्या यादीमध्ये दि. २४.८.२०२२ रोजी प्रकरण प्राप्त दिनांक अशी नोंद असून माझ्या जेष्ठतेमध्ये फरक पडलेले आहे. | आक्षेपानुसार नमुद करण्यात येते की, आपण दिनांक २४.०८.२०२१ रोजीचे अर्जानुसार अनुकंपा तत्वावर नेमणूकीकरीता प्रथम प्रकरण सादर केलेल्या अर्जासोबत इतर दस्ताऐवजा सोबत अपुर्ण परिशिष्ट ब सादर केलेले होते. त्यामुळे परिशिष्ट ब पुर्ण नसल्याने आपले नांव जेष्ठता यादीत घेतलेले नव्हते. त्यानंतर आपण दिनांक २४.०८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये परिपुर्ण भरलेले परिशिष्ट-ब व कुटूंब निवृत्ती वेतन मंजुरी आदेश सादर केल्याने प्रकरण पुर्ण झाले आहे. त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार दि. २४.८.२०२२ पासून जेष्ठता लावण्यात आली आहे. आपले आक्षेप अमान्य करण्यात आले. | आक्षेप अमान्य |
| ११ | १७५ पुर्ण | १८० | श्रीमती मिनल मनोज कोल्हे मु.बेलगांव पो.आंधळी ता.कुरखेडा जि.गडचिरोली | दिनांक २४.०३.२०२२ अन्वये माझे पती श्री मनोज यादव कोल्हे यांचे ०२.०९.२०२१ रोजी निधन झाल्याने अनुकंपा तत्वावर नौकरी मिळण्यास माझे नावाचे दस्ताऐवज सादर करण्यात आले आहेत. दि. १.९.२०२३ चे अर्जान्वये माझ्या ऐवजी माझा मुलगा कुमार जितेश मनोज कोल्हे याला अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यास अर्ज केलेला आहे. तरी आता प्रकाशित तात्पुरत्या जेष्ठता सुचीनुसार माझे ऐवजी माझे मुलाचे नांव समाविष्ठ करावे. | आपण दि. २४.०३.२०२२ रोजी अनुकंपा तत्वावर स्वत:ला नेमणूक मिळण्याकरीता अर्ज सादर केलेला आहे. त्यामुळे आपण घेतलेल्या आक्षेपानुसार शासन निर्णय दिनांक २१.०९.२०१७ मधील मुद्दा क्र. (२१) तरतुदीनुसार नावांत बदल करता येणार नाही. सदर शासन निर्णयात नावात बदल करण्याची कोणतीही तरतुद नसल्याने तुमच्या ऐवजी मुलाचे नाव समाविष्ठ करता येणार नाही. आपले आक्षेप मान्य करता येणार नाही. | आक्षेप अमान्य |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | ७९ अपुर्ण | १८४ | कु. अनम आयशा अ.मुजीब शेख मु.ता.वडसा जि.गडचिरोली | मी दि.१५.११.२०२२ रोजीला अनुकंपा तत्वावर नियुक्ती संबंधाने विहीत जोडपत्रातील अचुक परिपुर्ण माहिती परिशिष्ट ब व संमतीपत्र सादर केलेला आहे. तरी सन २०२३ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या अनुकंपा तत्वावरील नियुक्ती संबंधाने माहितीपुर्ण यादीमध्ये माझे नांव समाविष्ठ करण्यात यावे. | आपल्या आक्षेपानुसार प्रकरणाची तपासणी केली असता दिनांक १५.११.२०२२ रोजी प्रकरण पुर्ण झालेले आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार दि.१५.११.२०२२ पासून जेष्ठता लावण्यात आलेली आहे. आपले आक्षेप मान्य करण्यात आले आहे. | आक्षेप मान्य |
| १३ | २१३ अपुर्ण | | कु.मृणालिनी प्रभाकर तोराम मु.पुसुकपल्ली ता.अहेरी जि.गडचिरोली | मा.उपायुक्त (आस्थापना) नागपुर विभाग नागपुर यांचे कार्यालयीन पत्र दि.१०.२.२०२२ नुसार एक वर्षाचे विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विलंब क्षमापित आदेश आपल्या कार्यालयास प्राप्त झाले आहे. दिनांक ११.१०.२०२२ नुसार माझे अनुकंपा तत्वावर नेमणूक करतेवेळी सादर करावयाचे परिशिष्ट ब व आवश्यक दस्ताऐवज आपल्या कार्यालयास सादर करण्यात आले आहे. परंतू प्रकाशित करण्यात आलेल्या अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या जेष्ठता सुचीमध्ये माझे नांव समाविष्ट करण्यात आलेले नाही. तरी अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या जेष्ठता सुचीमध्ये माझे नांव समाविष्ठ करण्यात यावे. | मा.उपायुक्त (आस्थापना) नागपुर विभाग नागपुर यांचे कार्यालयीन पत्र दि १०.२.२०२२ नुसार अनुकंपा सुचीमध्ये आपले नांव समाविष्ठ करण्यात आले आहे. दिनांक ११.१०.२०२२ नुसार माझे अनुकंपा तत्वावर नेमणूक करतेवेळी सादर करावयाचे परिशिष्ट ब व आवश्यक दस्ताऐवज आपल्या कार्यालयास सादर करण्यात आले आहे. परंतु सदर अर्जासोबत प्रकरणाचे अनुषंगाने आवश्यक असलेले अविवाहीत असल्याचे शपथपत्र व सेवा पुस्तकाची प्रथम पानाची प्रत जोडण्यात आलेली नव्हती. ती आपण दि. ०२.०४.२०२४ रोजीचे अर्जासोबत सादर केली असल्याने त्या दिनांकाला प्रकरण पुर्ण झालेले आहे. त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार दि. ०२.०४.२०२४ पासून आपली जेष्ठता निश्चित करून सन २०२४ च्या प्रसिध्द होणाऱ्या अनुकंपा प्रतिक्षा सुचीमध्ये जेष्ठता लावण्यात येईल. आक्षेप अंशतः मान्य करण्यात आले आहे. | आक्षेप अंशतः मान्य |
| १४ | ८८ अपुर्ण | १९४ | कु.कांचन प्रदिप मानकर (बरडे) रा.बोरगांव (भा.) ता.वरोरा जि.चंद्रपुर | विहीत जोडपत्रातील अचुक परिपुर्ण माहिती, सेवा पुस्तकाच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, कु.नि.वे. मंजुरीचे आदेशाची प्रत, अनुकंपा तत्वावर ज्यास नियुक्ती द्यावयाची आहे त्यांचे कुटूंबातील इतर सदस्यांचे संमती पत्र रू.१००/- चे कोर्ट स्टॅम्पवर, कुटूंबातील कोणीही सदस्य शासकीय/ निमशासकीय सेवेत आहेत किंवा कसे याबाबतचे प्रतिज्ञालेख रू. १००/- चे कोर्ट स्टॅम्पवर, कोर्टाचे कुटूंबाचे वारसान प्रमाणपत्र, अर्जदाराचे लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र रू. १००/- कोर्टस्टँपवर, जातीबाबत प्रमाणपत्र,अर्जदाराचे विवाहीत/अविवाहीत/ पुर्नविवाह बाबतचे प्रमाणपत्र (अर्जदार विवाहीत असल्यास पती/ पत्नी याचे व्यवसाय नोकरी बाबतचे १००/- स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख). नमुद संपुर्ण दस्ताऐवज यापुर्वीच दि. २२.०२.२०२१ ला आपले कार्यालयात सादर करण्यात आलेले आहे. | आपल्या आक्षेपानुसार दि. २२.२.२०२१ रोजी सादर केलेल्या अर्जामध्ये अनुकंपा तत्वावर नेमणूकीकरीता आवश्यके असलेले परिशिष्ट ब, कु.नि.वे. आदेश जोडण्यात आलेले नसल्याने प्रकरण अपुर्ण होते. आपण परिशिष्ट ब, कु.नि.वे. आदेशाची प्रत दि.१२.०४.२०२३ रोजीच्या अर्जासोबत सादर केलेले असल्याने त्यादिनांकाला प्रकरण पुर्ण झालेले आहे. त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार आपली दि. १२.०४.२०२३ पासून जेष्ठता लावण्यात आलेली आहे. आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. | आक्षेप अमान्य |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १५. | ६५ अपुर्ण | २०१ | श्री सुमित शालीकराम ढोके मु.पो.त.ब्रम्हपुरी लुबिनी नगर आरमोरी रोड जि.चंद्रपुर | १) आपण प्रसिध्द केलेल्या यादीत माझे वडील प्राथ.शि. अशी नोंद दर्शविलेली आहे. माझे वडील हॉयस्कुल सहा.शिक्षक म्हणून कार्यरत होते. २) मला अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यासंबंधीचा माझा अर्ज दि.३०.११.२०१५ ला सादर करण्यात आलेला आहे. आपण प्रसिध्द केलेल्या यादीत ४.५.२०१६ अशी नोंद आहे. ३) आपले कार्यालयीन नोंद क्र. ४९३ मध्ये माहीती पुर्ण दिनांक २७.०६.२०२३ अशी नोंद आहे. परंतु आपण प्रसिध्द केलेल्या यादीत सेवा पुस्तकाची छायांकित प्रत व कोर्टाचे वारसान प्रमाणपत्र अप्राप्त असल्याचे प्रलंबित प्रकरणात नाव समाविष्ट करण्यात आलेले आहे. ४) मी दि. १०.११.२३ ला MSCIT व अनुभव प्रमाणपत्र आपल्या कार्यालयात सादर केले. परंतु माझ्या अनुकंपा प्रस्तावात याची नोंद नाही. सर्व कागदपत्रांची पुर्तता करण्यात येत आहे. प्रलंबित प्रकरणांच्या प्रतिक्षाधीन यादीतुन माझे नांव कमी करून परिपुर्ण कागदपत्रांच्या सूचीत माझे नाव समाविष्ट करण्याबाबत. | आपण घेतलेल्या आक्षेपानुसार प्रकरणाची तपासणी केली असता आपण दि. ३०.११.२०१५ ला सादर केलेल्या अर्जासोबत परिशिष्ट ब व इतर दस्ताऐवज सादर केलेले नाही. ते आपण दि. २७.६.२०२३ ला परिशिष्ट ब व इतर दस्ताऐवज सादर केल्याने प्रकरण त्या दिनांकाला पुर्ण झाले आहे. त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार दि.२७.६.२०२३ पासून आपलीजेष्ठता लावण्यात आलेली आहे. आक्षेप अंशत: मान्य करण्यात येत आहे. | आक्षेप अंशतः मान्य |
| १६ | १६६ पुर्ण | २०४ | कु.प्रतिक्षा राजेंद्र धाईत मु.राजेंद्र वार्ड, देसाईगंज ता.देसाईगंज जि.गडचिरोली | परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुकंपा धारकाचे तात्पुरती प्रतिक्षाधिन सुचीमध्ये अनु. १६६ वर माझ्या मुलीचे नाव कु. प्रतिक्षा राजेंद्र धाईत रा. देसाईगंज समाविष्ठ आहे. त्यात खालीलप्रमाणे त्रूटी दिसुन येतात. १) १८ वर्ष पूर्ण झाल्याचा दि. ०१.०८.२०१२ आवश्यक दुरूस्ती दि. २३.०८.२०२३ २) उमेदवारांची जन्मतारीख ०२.०८.१९९४ आवश्यक दुरूस्ती दि. २३.०८.२००५ ३) जात -इमाव आवश्यक दुरूस्ती वंजारी ४) प्रवर्ग-इमाव आवश्यक दुरूस्ती भटक्या जमाती (ड) | आक्षेपानुसार प्रकरणात सुधारणा करण्यात आली असून १८ वर्ष पुर्ण झाल्याचा दिनाक १.८.२०१२ ऐवजी दिनांक २३.८.२०२३ अशी दुरूस्ती तसेच जन्मतारीख ०२.०८.१९९४ ऐवजी दि. २३.०८.२००५ व जात -इमाव ऐवजी वंजारी, प्रवर्ग-इमाव ऐवजी भटक्या जमाती (ड) अशी करण्यात आलेली आहे. आक्षेप मान्य करण्यात आलेला आहे. | आक्षेप मान्य |
| १७ | अपुर्ण | २०५ | कु.जयश्री प्रभाकर बाकमवार मु.कुनघाडा माल ता.चामोर्शी जि.गडचिरोली | मला अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे याबाबत दि.१३.१०.२०२३ ला आपल्या कार्यालयास अर्ज सादर केला आहे. परंतु आजपर्यंत माझे नांव अनुकंपा तत्वावरच्या जेष्ठता यादीमध्ये आलेले नाही. | नमुद आक्षेपानुसार अनुकंपा यादीमध्ये नांव समाविष्ठ करण्यात आले असून सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार दिनांक १३.१०.२०२३ नुसार जेष्ठता लावण्यात आलेली आहे. | आक्षेप मान्य |
| १८ | २४२ अपुर्ण | २०७ | श्री वैभव हरिदास कुंभारे, झाशी राणी नगर वार्ड नं. १५ ITI चौक गडचिरोली | अनुकंपा यादीमध्ये माझा रहिवासी पत्ता चुकीचा दाखवित आहे. तरी सुध्दा माझा योग्य रहिवासी पत्ता बदलुन देण्यात यावा. माझा रहिवासी पत्ता- झाशी रानी नगर वार्ड क्र.१५ ITI चौक गडचिरोली आहे. तसेच मी माझे पुर्ण दस्तावेज सादर केले असून माझ नाव पुर्ण यादीत आले नाही. तरी माझे नांव पुर्ण यादीत यावे. | आक्षेपानुसार आपले रहिवासी पत्यामध्ये सुधारणा करण्यात आली असून आपण दि. १७.११.२०२३ ला सादर दस्ताऐवजानुसार प्रकरण पुर्ण झाले असल्याने सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार दिनांक १७.११.२०२३ पासून जेष्ठता लावण्यात आलेली आहे. आक्षेप मान्य करण्यात आलेला आहे. | आक्षेप मान्य |
| १९ | २५६ अपुर्ण | २०८ | श्री धिरज गजानन सोनुले ओम नगर वार्ड नं. १७ चामोर्शी रोड, गडचिरोली. | अनुकंपाच्या यादीत अपूर्ण यादीमध्ये माझे नांव आहे. माझ्या कुटूंबातील कोणतीही व्यक्ती शासकीय / निमशासकीय सेवेत कार्यकरत नसल्याबाबत प्रतिज्ञालेख मी जोडलेला आहे. तरी पण माझे नांव अपुर्ण यादीत जोडलेला आहे. ते नांव पुर्ण यादीत घेण्यात यावे. | नमुद आक्षेपानुसार कुटूंब निवृत्ती वेतन मंजुरी आदेशाची प्रत दि. ११.१२.२०२३ ला सादर केल्याने प्रकरण पुर्ण झालेला आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२१.९.२०१७ मधील परिच्छेद १०(ई) मधील तरतुदीनुसार दिनांक ११.१२.२०२३ पासून जेष्ठता लावण्यात आलेली आहे. आपले आक्षेप मान्य करण्यात आलेला आहे. | आक्षेप मान्य |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | २५७ अपुर्ण | २२७ | श्री कार्तिकेय शंकरराव कोरंटलावार मु.नवेगांव पो.मुडझा ता.जि.गडचिरोली | अनुकंपा तत्वावर नौकरी मिळण्याकरीता अर्ज करण्यात आले असुन अर्जासोबत संपुर्ण आवश्यक कागदपत्रे जोडण्यात आले होते. परंतु प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीवर कागदपत्रे अप्राप्त असल्याचे नोंदविण्यात आले आहे. | आपल्या आक्षेपानुसार प्रकरणाची पडताळणी केली असता आपल्या अर्जासोबत आवश्यक असलेले दस्ताऐवज (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र व विवाहीत/अविवाहीत बाबतचे प्रतिज्ञापत्र) सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे आक्षेप अमान्य करण्यात आलेला आहे. | आक्षेप अमान्य |

**स्वाक्षरी**
**(आयुषी सिंह,भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद गडचिरोली**

**स्वाक्षरी**
**( शेखर मा. शेलार )**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)**
**जिल्हा परिषद गडचिरोली**